महाराष्ट्र शासन

**जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र**

शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, जी. एस. ग्राऊंडजवळ, जळगाव

Website:www.mahaswayam.gov.in Email: jalgaonrojgar@gmail.com

दूरध्वनी क्र. :- ०२५७-२९५९७९०


क्र.२६/जिकौविरोवउमाकेंज/कौ.वि.-कौ.मा.स./2400/2023 दिनांक : ९ ऑगस्ट, २०२३

प्रति,

**मा. संचालक**

**व्यवस्थापन अभ्यास शाळा,**

**मा. समन्वयक,**

**विशारद, कौशल्य विकास केंद्र,**

**कबचौउमवि, जळगाव**

**विषय:- दि.** 01 **जुलै ते** 15 **ऑगस्ट,** 2023 **दरम्यान "कौशल्याची मागणी सर्व्हेक्षण" (Skill Needs Assesment Survey) मोहिमेचे आयोजन करणेबाबत....**

**संदर्भ:**-1. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचे पत्र जा.क्र. MSSDS/ 2022-23/653 दिनांक 28.06.2023

2. मा.जिल्हाधिकारी, जळगाव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 04 जुलै, 2023 रोजी संपन्न झालेली कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, जिल्हा कार्यकारी समितीची बैठक

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर करण्यात येते की, **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या** अधिपत्याखालील **महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई (MSSDS)** राज्यामध्ये कौशल्य विकास उपक्रमांची अंमलबजावणी व संनियंत्रण करणारी **नोडल एजन्सी** म्हणून कार्यरत आहे. MSSDS मार्फत या कार्यालयाद्वारे कौशल्य विकासाच्या केंद्र व राज्य शासन पुरस्कृत विविध प्रशिक्षण योजना जिल्हयात राबविल्या जातात.

मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत असलेल्या **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती** मार्फत जिल्हयासाठी **जिल्हा कौशल्य विकास वार्षिक आराखडा** तयार करण्यात येतो. सदर आराखडयात अंतर्भूत असलेल्या कोर्सेसचे प्रशिक्षण स्किल इंडीया पोर्टलवर जिल्हयातील नोंदणीकृत प्रशिक्षण संस्थांच्या (TP/TC) माध्यमातून युवक-युवतींना दिले जाते. उक्त संदर्भ क्र.02 अन्वये आयोजीत बैठकीत मा.जिल्हाधिकारी महोदय यांनी **"कौशल्याची मागणी सर्व्हेक्षण" (Skill Needs Assesment Survey)** या मोहिमेअंतर्गत जिल्हयातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तांत्रिक विद्यालये, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, तंत्र निकेतन महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये इ. ना अधिकाअधिक उमेदवारांची नोंदणी करणेबाबत आवाहन केले आहे. तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगाव या कार्यालयाशी समन्वय साधुन सदर मोहिम यशस्वीरित्या राबविणेबाबत सुचना केलेल्या आहेत. जेणेकरुन जास्तीत-जास्त इच्छूक उमेदवारांना कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या संधीचा लाभ घेता येईल.

**प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान** व **किमान कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम** यासह केंद्र व राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी याकरिता जिल्हयातील युवक-युवतींना आवश्यक असलेले आणि त्यांनी मागणी केलेले कौशल्य प्रशिक्षण प्रदान केल्यास उमेदवारांच्या प्रशिक्षणादरम्यान स्वारस्यामध्ये वृध्दी होऊन

Scanned with OKEN Scanner

अनुपस्थितीचे प्रमाण कमी होईल आणि प्रशिक्षणाअंती यशस्वी उमेदवारांना रोजगार-स्वयंरोजगाराच्या अधिक प्रमाणात संधी उपलब्ध होतील अशी विभागाची धारणा आहे.

त्याकरीता जिल्हयातील युवक-युवतींच्या मागणीवर आधारीत (Demand Driven) कौशल्य प्रशिक्षण पुरविण्यासाठी **"कौशल्याची मागणी सर्व्हेक्षण"** (Skill Needs Assesment Survey) मोहिमेचे **दिनांक 01 जुलै ते 15 ऑगस्ट, 2023** दरम्यान आयोजन करण्यात येत आहे. सदर मोहीमेंतर्गत सर्व्हेक्षणासाठी गुगल फॉर्म तयार करण्यात आला असून, **गुगल फॉर्म लिंक :** https://bit.ly/Student_Skill_Need_Assessment अशी आहे.

गुगल फॉर्म भरतांना जिल्हयातील **शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांतील विविध शाखेतील विद्यार्थी, शालेय/महाविद्यालयीन शिक्षणातून गळती झालेले/शिक्षण सोडलेले/नोकरीच्या शोधात असलेले उमेदवार तथापि, समाजातील वंचित घटकातील** जास्तीत जास्त उमेदवारांचा समावेश करण्यात यावा. **"कौशल्याची मागणी सर्व्हेक्षण" हा गुगल फॉर्म भरण्याची अंतिम मुदत दिनांक 15 ऑगस्ट, 2023 राहील.**

जिल्हयातील युवक-युवतींना मागणी असलेले गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण दर्जेदार प्रशिक्षण संस्थांमधून प्राप्त व्हावे, या द्रृष्टीकोनातून **दिनांक 01 जुलै ते 15 ऑगस्ट, 2023 दरम्यान राबविण्यात येणारी "कौशल्याची मागणी सर्व्हेक्षण" ही मोहीम यशस्वी होणेसाठी आपल्या विशेष सहकार्याची अपेक्षा आहे.**

**तरी, सदर लिंक आपल्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे संकेतस्थळावर टाकण्यात यावी जेणेकरुन विद्यार्थ्यांची नोंदणी करणे सोयीचे होईल.**

**उमेदवारांसाठी गुगल फॉर्म लिंक :** https://bit.ly/Student_Skill_Need_Assessment

आपला

सहायक आयुक्त,
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता,
जळगाव (करीता)

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :**

1. **मा.आयुक्त,** कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई.
2. **मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,** महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
3. **मा.जिल्हाधिकारी** तथा **अध्यक्ष** कौशल्य, रोजगार, उदयोजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती, जळगाव.
4. **मा. उपआयुक्त,** कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय, नाशिक.

सहायक आयुक्त,
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता,
जळगाव (करीता)

Scanned with OKEN Scanner